शासकीय कृषी योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा : (२०१२-१३ ते २०२१-२२)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव्यविद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

शितल कैलास नावडे

सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. डी. के. मगर

पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे विद्यासंकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर २०२२

शासकीय कृषी योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा:

(२०१२-१३ ते २०२१-२२)

प्रस्तावना (Introduction)

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारताची अर्थव्यवस्था हि कृषीवर आधारीत आहे. त्यामुळे भारतीय शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासाच्या अनुशंगाने भारतीय शेती करणे अनिवार्य आहे. भारतात प्रमुख व्यवसायात शेतीचे प्रथम स्थान आहे. ग्रामीण भागातील बहूतांशी लोक हे शेतीशी निघडीत आहेत. शेती या प्रमुख व्यवसायाला अनुसरून शेतीपुरक अनेक शेळी पालन, गोपालन, मच्छीपालन, रेशीम उद्योग, वनशेती, फुलशेती आदी अनेक जोडव्यवसाय हे शेतीवर आधारित आहेत. म्हणुनच शेती हि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती हे भारतीय अर्थव्यवस्थेचे पायाभुत क्षेत्र मानले जाते. कारण मानवाची अन्नविषयक मुलभुत गरज व उद्योग क्षेत्राला लागणारा कच्चा माल शेतीतूनच उपलब्ध होत आसतो. त्यामुळे कोणत्याही क्षेत्राच्या आर्थिक विकासात शेतीला व शेतीमालाला महत्वाचे स्थान आहे. म्हणून प्राचिन काळापासून ते आजस्थितीत कृषीला अनन्यसाधारण असे महत्व असलेले पहावयास मिळते. परंतु शेतीसिंचनाची कमतरता, अतिवृष्टी, दृष्काळ या नैसर्गिक आपत्तीमुळे व तसेच शेतीमालास कमी भाव, दळणवळणाच्या अपुऱ्या सोयी, कृषी विकासाच्या अपुऱ्या सुविधा, महागायी, वाढते उद्योग, रसायनाचा मोठयाप्रमाणावर उपयोग, आधुनिकीकरण, जागतीकीकरण या सारख्या बाबीचा कृषी क्षेत्रावर विपरित परिणाम झालेला दिसून येतो. येवढे असुनही आजस्थितीतही ग्रामीण अर्थव्यवस्था हि कृषी व्यवस्थेवरच आधारित आहे.

भारतासारख्या बलाढय लोकसंख्या असलेल्या देशाला अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी कृषी हे एकमेव प्रमुख साधन आहे. तसेच उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासासाठी हि कृषीव्यवस्थाच महत्वाची ठरताना दिसून येते. देशातील ५५ ते ५८ टक्के लोकांना रोजगार मिळवून देण्याचे एकमेव क्षेत्र हे कृषी आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उदभवलेल्या बिकट उपासमारीच्या परिस्थितीतून देशाला बाहेर काढण्याचे महत्वाचे कार्य ज्यांनी केले ते हरित क्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन म्हणतात की,

कृषी क्षेत्राच्या विकासाशिवाय कोणत्याही देशाचा आर्थिक विकास होणे अशक्य आहे. देशाला विकसनशिलतेच्या वाटेवर प्रवास करून विकसित व्हायचे असेल तर प्रथम कृषीक्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातही सुरूवातीच्या काही कालावधीमध्ये भारतीय कृषीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे भारतीय शेती हि मागासलेली व पांरपरिक स्वरूपांची राहिली होती. परंतु देशाच्या अन्नधान्याची गरज वाढता अन्नधान्याचा तुटवडा लक्षात घेवुन देशातील तात्कालिन सरकारने कृषी नियोजन व व्यवस्थापनावर भर देण्यास सुरूवात केली. पंचवार्षिक योजना, तसेच केंद्र सरकार व राज्यसरकारच्या नियोजनात कृषी व्यवस्थापनावर जास्तीचा भर देण्यात सुरूवात केली. शासन स्तरावरून कृषी विकासाला गती देण्याकरीता विविध कृषी विकास कार्यक्रम, योजनावर भर दिला गेला. या योजनेतुन शेतीचे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, सिंचनक्षेत्र विकास, भुक्षेत्राचा विकास होवून शेती उत्पादकता वाढविण्याचे उद्दिष्टे समोर ठेवले गेले. केंद्र सरकार व राज्यसरकारच्या माध्यमातून शेतीविकासाच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी शासनस्तरावरून राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान, पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, जलयुक्त शिवार अभियान, कृषी संजीवनी प्रकल्प, सहकार मित्र योजना, महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, अटल सौर पंप योजना, राष्ट्रीय कामधेनु योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना, एक शेतकरी एक डीपी योजना, ट्रॅक्टर अनुदान योजना, ठिबक सिंचन अनुदान योजना, तुषार सिंचन योजना, पोखरा योजना, शेळया बोकट गट वाटप योजना, ग्रासमृध्दी शेतीपालन शेड अनुदान योजना, पशुपालन कर्ज योजना, एकात्मिक फल उत्पादन योजना अशा विविध योजनेच्या माध्यमातून कृषी आणि संबंधित क्षेत्रांचा विकास करणे हे प्रमुख उद्दिष्टे आहे. कृषी पायाभुत सुविधा निर्माण करणे, कृषी व्यवसाय उद्योगाला चालना देणे, कृषी आर्थिक क्रियाकलापांचे मुख्य स्त्रोत म्हणून शेती विकसित करणे, शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना बळ देणे व आर्थिक उत्पादन वाढविण्यासाठी मदत करण्यासाठी विविध योजनेच्या माध्यमातून शासन प्रयत्नशिल आहे.

प्रस्तुत संशोधन विषयासाठी यवतमाळ जिल्हयातील कृषी विकाससंबंधीत कार्यरत असलेल्या निवडक योजनाचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्या योजनामध्ये राष्ट्रीय कृषी योजना :- मृदा आरोग्य संवर्धनाबाबत उपक्रम, पाणलोट क्षेत्रामध्ये आणि बाहेरील पावसावर आधारित शेती प्रणालीचा विकास, एकात्मिक कीड व्यवस्थापन योजना, विस्तार सेवांचा प्रचार, फलोत्पादनाच्या वाढीशी संबंधित उपक्रम, पशुसंवर्धन आणि मत्स्यपालन विकास उपक्रम, सेंद्रिय आणि सेंद्रिय खते, रेशीम उत्पादन, किसान क्रेडिट कार्ड योजना इ. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना :- ठिबक सिंचन अनुदान योजना, तुषार सिंचन योजना,

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान : पिकनिहाय आधारित सिंचन साधने सुविधा व यंत्र व औजारे यासाठी लाभ दिला जातो. इलेक्ट्रीक मोटार, डिझेल इंजिन, पीव्हीसी पाईप्स, पेरणी यंत्र, बीबीएफ पेरणी यंत्र, मळणी यंत्र, तसेच बियाणे, पिक संरक्षण औषधे, सुक्ष्म मुलद्रव्ये इ. घटकांना लाभ दिला जातो. आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या व जोडव्यवसायाच्या राष्ट्रीय कृषी विकास योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पत हमी निधी योजना, कृषी यांत्रिाकीकरण योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, पिक कर्ज योजना, गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना इ. योजनांचा आढावा प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात येणार आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा (Review of Literature)

प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून अध्ययन विषयाशी निघडीत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवरून पुर्वी झालेल्या संशोधनाचा संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. साहित्यात विविध संशोधकांनी केलेले शोधप्रबंध, लघुशोध प्रबंध, संशोधन लेख, मुलभुत ग्रंथ, शासकीय अहवाल, प्रगती अहवाल, माहिती आदिचा आढावा संदर्भ साहित्याच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे.

१) कुलकर्णी एस. वाय (१९८७), यांनी प्रस्तुत संदर्भ sprinkler and drip irrigation system shin, Vol.1.6 यामध्ये नवीन जलसिंचन तुषार सिंचन व ठिबक सिंचनाविषयी अभ्यास केला आहे.

2) कोरे गोरख यांनी (२०१५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ मध्ये सादर केलेल्या शोधप्रबंधात १९९०-९१ ते २०१०-११ पर्यंतचा कालावधी निवडलेला असुन त्यात त्यांनी जलसिंचन बि-बियाणे, रासायनिक खते, औषधे, कृषी औजारे यांचा अभ्यास केला आहे.

३) INCID (१९९४) : शिवनप्पन १९९४ : शेतीमध्ये पाण्याचा शाश्वत व कार्यक्षम वापर करुन शेतीमध्ये पाण्याच्या कार्यक्षमतेचे महत्त्व नोंदवले आहे. मागणी व्यवस्थापन यंत्रणा म्हणजे सुक्ष्म सिंचन जसे की, ठिबक आणि स्प्रींकलर सिंचन पध्दतीचा अवलंब. हि सिंचन प्रणाली योग्यरित्या तयार केलेल्या आणि व्यवस्थापित केलेल्या सिंचनप्रणालीमध्ये पाण्याच्या वापराची कार्यक्षमता १००% पर्यंत वाढते असे विश्लेषीत केले आहे.

४) चव्हाण टि.एस. (१९९५): “Irrigation in avid Lands” या पुस्तकात कोरडवाहू जमीन अधिक ओलीतीखाली आणण्याच्यादृष्टीने नविन सिंचन प्रणाली उपयुक्त असल्याचे म्हटले आहे. कोरडवाहू जमीनीचे वैशिष्ट्ये म्हणजे कमी सरासरी पर्जन्यमान व उच्च गुणांक, दैनंदिन आणि वार्षिक

तापमानातील चढउतार, तीव्र वाऱ्याची व्यवस्था आणि संभाव्य बाष्पीभवनाचा उच्चदर, यामुळे जागतिक वाढत्या लोकसंख्येसाठी अन्न उत्पादनात मोठी वाढ आवश्यक आहे. थोडक्यात वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवण्यातील वाढीच्या दृष्टीने सदर पुस्तकात कोरडवाहू आणि निमकट भागात नविन सिंचन प्रणालीचे महत्त्व सांगितले आहे.

५) पाटील डी.के. (२०००) : “ A study Economics of percolation tanks and their impact on agricultural development” या पीएचडी संशोधनामध्ये पाझर तलावांचा कृषी विकासावर होणारा परिणाम अभ्यासला आहे.

६) बंदुके किसन (२०१५): यांनी पीएचडी पदवी करीता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात शोधप्रबंध सादर केलेला आहे. सातारा जिल्ह्यातील कृषी उत्पादकता आणि कृषी प्रारुपांचा भौगौलिक अभ्यास केलेला आहे. या प्रबंधाचा कालावधी १९९० ते २०१० पर्यंतचा आहे. त्यांनी या विषयावर सातारा जिल्ह्यातील कृषी उत्पादकता आणि कृषी प्रारुपांचा अभ्यास अतिशय चिकित्सक पध्दतीने केलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्व : (Significance of Study Subject)

यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेला असून या जिल्हयाला एकूण सहा जिल्हयाच्या सिमा लाभलेल्या आहेत व एक तेलंगणा राज्याची सीमा लागलेली आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने अमरावती विभागातील सर्वात मोठा जिल्हया असून महाराष्ट्रातील ६ नंबरवर मोठा जिल्हा म्हणून नोंद आहे. यवतमाळ जिल्हा हा डोंगरदऱ्या, माळरान, जंगल व वनानी अच्छादलेला, दृष्काळग्रस्त व कोरडवाहू जिल्हा म्हणून सर्व परिचित आहे. सर्वाधिक शेतकरी आत्महत्येचा जिल्हा म्हणूनही परिचीत आहे. पिकांच्या अस्थिर किमंती, कोरडा दृष्काळ, ओला दृष्काळ, पारंपारिक शेती पध्दती, आधुनिक शेती तंत्राचा अभाव, नापिकी इ. कारणामुळे शेती उत्पादनात वेळोवेळी घट दिसून येते. यामुळे विदर्भातील जिल्हयातील शेतीविकासास शासन विविध योजना व विकास कार्यक्रम राबवून शेतीविकासावर भर दिलेला आहे.

१) यवतमाळ जिल्हयातील कृषी विकासाचा आढावा घेण्यासाठी या संशोधनाची आवश्यकता आहे.

२) यवतमाळ जिल्हयातील शेती विषय अंमलात आणलेल्या योजनेचा आढावा घेण्यासाठी.

३) विविध योजनातून शेतीत होणाऱ्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी.

४) कृषी योजनेतुन शेती उत्पन्नात होणाऱ्या वाढीचा अभ्यास करण्यासाठी.

५) पारंपारिक कृषी पध्दतीत होणारे कृषी यांत्रिकीकरण याचा अभ्यास करण्यासाठी.

६) कृषी योजनेतून सिंचन क्षेत्रातील झालेल्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी..

७) कृषी संबंधित विकास योजनेतून कृषी आधारीत जोड व्यवसाय कितपत शेतकऱ्या उपलब्ध होत आहे हे अभ्यासण्यासाठी

८) राष्ट्रीय सुरक्षा अभियानातून कृषी व्यवस्थेत झालेल्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी.

६) शासनाद्वारे राबविण्यात आलेल्या कृषी योजना आणि प्रत्यक्षात आमंलात आणल्या जाणाऱ्या योजना यांचा अभ्यास करण्यासाठी.

१०) कृषी योजनेचा लाभ घेतलेला लाभार्थी मिळालेल्या योजनेतून समाधानी आहेत का याचा अभ्यास करण्यासाठी.

११) कृषी योजना घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन आवश्यक व महत्वाचे ठरणारे आहे.

संशोधनाचा कालावधी : (Time period of Research)

प्रस्तुत संशोधनासाठी शासन स्तरावरून चालणाऱ्या विविध योजनाचा परिणाम व कृषी क्षेत्राचा **होणारा विकास अभ्यासण्यासाठी** (२०१२-१३ ते २०२१-२२) या कालावधीतील योजनाचा अभ्यास करण्यात येणार आहे. म्हणून संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी (२०१२-१३ ते २०२१-२२) पर्यतचा कालावधी निश्चित केला आहे. याच कालावधीत अंमलात आलेल्या योजनाचे मुल्यमापन व त्यातुन होणारा शेती विकास अभ्यासण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टये : (Objectives of Research)

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टये निश्चित करून त्या आधारे पुढील संशोधन करण्यात येणार आहे.

१) यवतमाळ जिल्हयात शासन स्तरावरून चालणाऱ्या विविध योजनाचा अभ्यास करणे.

२) कृषी योजनेतील शेतकऱ्यांचा सहभागाचे अध्ययन करणे.

३) कृषी विषयक योजनेतुन शेतीत होणाऱ्या बदलाचा व उत्पन्न वाढीचा अभ्यास करणे.

४) कृषी यांत्रिकीकरण योजना व शेतीतील बदलाचा अभ्यास करणे.

५) कृषी योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

संशोधन विषयाचे गृहितकृत्ये : (Hypothesis of Research)

१) कृषी योजना घेणाऱ्या शेतकऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

२) कृषी योजनेत शेतकऱ्यांचा सहभाग होत आहे.

३) कृषी योजनेतील शेतकऱ्यांच्या सहभागामुळे शेतउत्पन्नात वाढ होत आहे.

४) कृषी योजनांमुळे शेतीचे यांत्रिकीकरण होत आहे.

५) कृषी योजनेमुळे शेती विकासाला गती प्राप्त होत आहे.

संशोधन पध्दती : (Research Methodology)

प्रस्तुत संशोधना मध्ये "शासकीय कृषी योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास **विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा**" (२०१२-१३ ते २०२१-२२) या विषयावर संशोधन करण्यासाठी यवतमाळ जिल्हयाच्या संदर्भात तथ्य संकलन करण्यात येणार आहे. कृषी विकासासाठी शासनस्तरावरून अनेक विकासात्मक योजना राबवल्या जातात. परंतु या योजनांची यशस्वीता दोन बाबींवर अवलंबून असते. एक म्हणजे योजना ही किती प्रभावी व व्यावहारिक पध्दतीने बनवली व दुसरी बाब म्हणजे योजना कार्यान्वीत करण्यासाठी लोकांचा किती प्रमाणात पाठिंबा व सहकार्य, सहयोग मिळतो. या दोन्ही बाबींकरीता संशोधनातून प्राप्त केलेले ज्ञान क्रमबध्द व व्यवस्थितरित्या प्राप्त करण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा आधार घेण्यात येणार आहे. संशोधन विषयाची सत्यता व वस्तुनिष्ठता तपासण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा वापर करणे आवश्यक ठरते. म्हणून प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने माहिती संकलन करीत असताना संशोधनात खालील पध्दतींचा अवलंब करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन विषय योगदान व समस्या रुपात असल्याकारणाने या संशोधनाचा प्रकार जास्तीत जास्त व्यावहारिक आहे. म्हणून जास्तीत जास्त संख्यात्मक तर काही अंशी गुणात्मक अशा भिन्न स्वरुपात अभ्यासण्यात येणार आहे.

संशोधनाचा आराखडा :

संशोधन आराखडा संशोधनाची एक योजना, संरचना आणि एक रणनीती आहे. ज्याद्वारे संशोधन प्रश्नांची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्नत्व प्रसरणावर नियंत्रण ठेवले जाते. या दृष्टीने संशोधनासाठी आराखडयाचे महत्व आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आलेला आहे. कारण या आराखडयात तथ्य संकलनासाठी वैज्ञानिक तंत्राचा

उपयोग करून वस्तुनिष्ठ तथ्ये संकलित केली जातात. वर्णनात्मक संशोधन आराखडयात, मुलाखत, अनुसुची, प्रश्नावली, निरिक्षण इत्यादी तथ्य संकलनाच्या तंत्राचा समावेश केला जातो. दुसरे कारण असे की, संशोधन उद्देश्याच्या अनुषंगाने समस्याच्या कारणांचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे व त्या समस्याचे निदान करणे गरजेचे आहे. म्हणून या संशोधनासाठी समग्र संशोधन आराखड्यापैकी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखडा वापरणे योग्य ठरते. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी या संशोधन आराखडयाची मदत घेण्यात येणार आहे.

नमुना निवड तंत्र : (Sample size and procedure)

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती यवतमाळ जिल्हयापुरती आहे. जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील प्रतिनिधीना समान न्याय देण्याहेतू प्रत्येक तालुका निहाय . कृषी विषयक योजनेच्या लाभधारकांची मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती प्राप्त करण्यात येणार आहे. (यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुके, प्रत्येक तालुक्यातील ५ गावे, म्हणजेच ८० गावे, प्रत्येक गावातील ५ ते ६ लाभार्थी अशा एकूण ४५० लाभधारकांची निवड अध्ययनासाठी करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन : (Data Collection)

कोणत्याही सामाजिक संशोधनाची सुरूवात ही तथ्य संकलनापासूनच होते. संशोधन हे वस्तुनिष्ठ तथ्य संकलनावर अवलंबून असते. तथ्याच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलन हे दोन प्रकारे करण्यात येणार आहे. या संशोधनात प्राथमिक तथ्य व दुय्यम तथ्य यांचा समावेश करण्यात आहे.

प्राथमिक तथ्य संकलन : (Primary Data Collection)

प्राथमिक तथ्य या पध्दतीमध्ये मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे. कारण ही पध्दत प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी सर्वसमावेशक आहे. या पध्दतीव्दारे शास्त्रशुध्द व मौलिक तथ्य संकलन करता येऊ शकते. ही मुलाखत अनुसूची संशोधन उद्दिष्टांना, प्रश्नांना अनुसरून जास्तीत जास्त बंदिस्त तर काही अंशी खुली अशा मिश्र स्वरूपाची तयार करण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्य प्राप्तीसाठी सहभागी

निरीक्षण व सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. याशिवाय गरजेनुसार प्रश्नावली व काही बाबतीत सहभागी निरीक्षण या पध्दतीद्वारेही प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात येणार आहे.

दुय्यम तथ्य संकलन : (Secondary Data Collection)

दुय्यम तथ्य संकलन दुय्यम तथ्य संकलन पध्दतीमध्ये "शासकीय कृषी योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास **विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा"** (२०१२-१३ ते २०२१-२२) या विषयाला अनुसरून माहिती प्राप्तीसाठी संबंधित विभागातील व इतर संलग्नीत विभागातील लिखीत दस्तावेज, वार्षिक अहवाल, संबंधीत संदर्भ ग्रंथ, शोध प्रबंध, विषयासंदर्भात मासिक, संशोधन लेख, दैनिक वृत्तपत्रे, संपादित लेख, ग्रामीण विकास व कृषी मंत्रालयाचे वार्षिक प्रगती अहवाल, माहिती पुस्तिका व वार्षिक प्रगती अहवाल, तहसिल, कृषी विभागातील मधील संकलीत माहिती, संकेतस्थळे इत्यादी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :- (Scope and Limitations of the study)

संशोधन समस्ये संबंधी तथ्य संकलनासाठी संशोधन क्षेत्र निष्चित करणे आवश्यक असते. त्याशिवाय योग्य तथ्य संकलनास व संशोधनास दिशा मिळणे अशक्य असते. "शासकीय कृषी योजनांचा अर्थशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा" (२०१२-१३ ते २०२१-२२) या विषयाला अनुसरून या संशोधनासाठी निवडलेला विषय निश्चितच देश व राज्य पातळीवर अतिशय महत्वपूर्ण अभ्यासविषय आहे. शासन स्तरावरून चालणाऱ्या कृषी योजना या खुप आहेत. पंरतु प्रस्तुत अभ्यासाकरीता निवडक अशा राष्ट्रीय कृषी योजना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या व जोडव्यवसायाच्या योजना यापुरताच या अभ्यासक्षेत्राची मर्यादा निश्चित करण्यात येणार आहे.

कृषी योजनेची उपलब्धी व त्यातून शेतीचा विकास, शेतीचे यांत्रिकीकरण, सिंचनक्षेत्राचा विकास, जोडव्यवसायाची उपलब्धी कृषी क्षेत्राच्या विकासास कितपत महत्वपूर्ण ठरतात. शेतीत होणारा बदल, लाभाधारकांना कृषी योजना घेताना येणाऱ्या समस्या व अडचणी अशा संदर्भातील विविध घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे. कृषी योजनेच्या अंमलबजावणीत प्रशासकीय यंत्रणेची कार्यप्रणाली व त्यांची भुमिका इत्यादी अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे. म्हणून प्रामुख्याने यवतमाळ जिल्हयातील अंमलात येणाऱ्या कृषी योजनेतील राष्ट्रीय कृषी विकास योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पत हमी निधी योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री

मुद्रा योजना, पिक कर्ज योजना, गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना या दहा योजनाच्या अभ्यासापुरतेचे संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र मर्यादित करण्यात येणार आहे.

प्रकरण योजना : (Chapters Scheme)

प्रस्तुत संशोधनाकरीता प्राथमिक पद्धतीद्वारे गोळा केलेल्या संपूर्ण तथ्यांचे प्रक्रिया व विश्लेषण एक्सल मॉस्टर चार्ट याद्वारे तथ्याचे विश्लेषन, सारणीयन व अर्थनिर्वचन करण्यात येईल. आवश्यक त्याठिकाणी अर्थशास्त्रीय सांख्यिकीय पद्धती, परीक्षणे, आलेख व आकृत्यांचा वापर केला गेला जाणार आहे. प्रकरण रचना

प्रकरण पहिले :- प्रस्तावना व संशोधन पध्दती.

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन विषयाच्या अभ्यासाची आवश्यकता

१.३ संशोधन विषयाचे महत्त्व

१.४ संशोधनाचे उद्दिष्ट्ये

१.५ गृहितकृत्ये

१.६ संशोधन पध्दती

१.७ तथ्य संकलन पध्दती

१.८ संशोधन कालावधी

१.९ संशोधनाच्या मर्यादा आणि आकडेवारीचे विश्लेषण

प्रकरण दुसरे :- संबंधित संशोधन साहित्याचा आढावा.

प्रस्तुत प्रकरणात अध्ययन विषयाशी निगडीत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवर संशोधकाच्या कार्याचा विविध लेखकांनी लिहिलेल्या लेखाचा किंवा पुस्तकाचा विषय अध्ययनासाठी अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच संबंधीत संशोधनावर झालेले कार्य याचाही अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :- यवतमाळ जिल्हा एक दृष्टिक्षेप

३.१ यवतमाळ जिल्ह्याची निर्मिती

३.२ यवतमाळ जिल्ह्याचे कृषी क्षेत्र

३.३ यवतमाळ जिल्ह्याचे भौगौलिक स्थान व विस्तार

३.४ लोकसंख्या

३.५ नदया

३.६	शेती करण्याची पध्दत

३.७	कृषी उत्पादन व उत्पादकता

प्रकरण चौथे :- कृषी योजना व शेतकरी

प्रस्तुत प्रकरणामध्ये यवतमाळ जिल्ह्यतील (२०१२-१३ ते २०२१-२२) या वर्षातील शासनाद्वारे राबविण्यात आलेल्या कृषी योजना आणि त्या योजनामधील शेतकऱ्यांचा सहभाग अभ्यासला जाणार आहे.

त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या सहभागातील अडचणी आणि कृषी योजनांचा अंमलबजावणी येणाऱ्या अडचणीचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण पाचवे :- यवतमाळ जिल्ह्याच्या कृषी विकासात शासकीय कृषी योजनांचे योगदान

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासनाद्वारे राबवल्या जाणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील कृषी योजनांचा अभ्यास (२०१२-१३ ते २०२१-२२) या कालावधीमध्ये शासनाकडून राबविलेल्या कृषी योजनांचा शेती क्षेत्रावर आणि शेतकरी वर्गावर कसा व किती परिणाम झाला याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे :- निष्कर्ष, सारांश आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाअंती प्राप्त झालेले निष्कर्ष आणि त्या अनुषंगाने महत्त्वाच्या शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भग्रंथ सूची : (Bibliography)

१)	सिंह आर, 2016, "भारतीय अर्थव्यवस्था", मॉक ग्रो व्हिल एज्युकेशन प्रायव्हेट लिमीटेड, दिल्ली.

२)	मयुर बी. एल, 2013, "कृषी अर्थशास्त्र", पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली.

३)	कविमंडल वि, 2012, "कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

3)	डॉ. मिश्रा ज.प, २०२० "कृषी अर्थशास्त्र", अथर्व पब्लिकेशन, जळगाव.

४)	मगर ज्ञा. 2021, "सरकारी योजना", रत्नाई पब्लिकेशन, सोलापूर.

५)	अग्रवाल स, 2012, "ग्रामीण भारत एवं भारतीय अर्थव्यवस्था", इशिका पब्लिकेशन हाऊस, जयपुर.

६)	भिसे रा, 2012, "कृषी विकासाचे अर्थशास्त्र आव्हाने व उपाय", प्रशांत पब्लिकेशन, दिल्ली.

७)	ढमढेरे एस, 2015, "अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती", डायमंड पब्लिकेशन, पुणे.

८)	घाटोळे रा. ना, 1997, "समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पध्दती", मंगेश प्रकाशन, नागपूर.

९)	बोधनकर सुधीर, 1999 “ सामाजिक संशोधन पध्दती”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.

१०)	Mittal A.C. & Sharma S.P, 2001, “Agricultural Economics”, RBSA, Publications, Jaipur.

११)	Swaminathan M.S, 2004 “First reports of National commission on farmer Govt. of India”, New Delhi.

१२)	“The Hindu Survey of Indian Agriculture”.

अहवाल / मासिक (Magazines & Annuities)

१)	महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२)	कृषी दैनंदिनी मराठवाडा, कृषी विद्यापीठ, परभणी.

३)	योजना मासिक, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, मुंबई.

४)	Maharashtra Economics Survey (२०१० - २०११)

संकेतस्थळ (Web Sides) :

१)	www.yavatmal.nic.in

२)	www.maharashtra.gov.in

३)	www.agricoop.nic.in

४)	www.mahades.maharashtra.gov.in

संशोधक
शितल कैलास नावडे
सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
डॉ. डी.के. मगर
पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड